## **शाश्वत विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत**
## **कृषि क्षेत्रात ड्रोन खरेदी पायलट प्रोजेक्ट**

**अटी व शर्ती –**

**पात्रता निकष :** या योजनेचा लाभ शेतकरी उत्पादक कंपनी यांना देण्यात येईल.

**अनुदान मर्यादा :** अनुदान मर्यादा. रु. ५,५३,५००/- प्रति ड्रोन
**खरेदीची प्रक्रिया :**

१. सदर योजना थेट डी.बी.टी. तत्वावर राबविण्यात येणार असल्यामुळे योजनेत दिलेल्या स्पेसीफीकेशन नुसार शेतकरी उत्पादक कंपनी आपल्या पसंतीने कृषि क्षेत्रात ड्रोन (मानव विरहीत वायु यान) उपविभागीय कृषि अधिकारी यांची पूर्व संमती मिळाल्या नंतर खरेदी करतील

२. प्रथमच पायलेट प्रोजेक्ट् म्हणुन योजना राबवावयाची असल्यामुळे शेतकरी उत्पादक कंपनीची निवड मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने करण्यात येईल.

३. शेतकरी उत्पादक कंपनी यांनी नोंदणीचे प्रमाणपत्र, सदस्य संख्या, बँक पासबुक, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र,नोंदणीकृत वितरकांचे दरपत्रक / कोटेशन, ड्रोन संबंधीत मान्यता प्राप्त संस्थेचा तांत्रिक तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

४. कोणत्याही अधिकृत पायलट प्रशिक्षण संस्थेकडून प्राप्त केलेला पायलट परवाना असणे आवश्यक आहे.

५. ड्रोन चालक हा किमान १० पास असणे आवश्यक आहे. व त्याचे मार्कलिस्ट ची झेरॉक्स प्रत. मोबाईल क्रमांक व पासपोर्ट फोटो आवश्यक राहील.

६. ड्रोन चालकाचा आधार कार्ड झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक राहील.

७. कृषि क्षेत्रात वापरासाठी केवळ Small व Medium या दोन प्रकारच्या ड्रोन साठीच अनुदान देय राहील. ड्रोन च्या दरपत्रकासोबत Type Certificate जोडणे अनिवार्ह राहील.

८. किसान ड्रोन कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./ड्रोन/गुनि ५/न.क्र.१८२/७४५३/२०२३ दि. २७-०२-२०२३ या पत्रात नमुद Specification चा वापर करण्यात यावा.

८. ड्रोन व्दारे नियंत्रित अवकाशात (Airspace) काम करण्यासाठी DGCA कडून Unique Identification मिळणे आवश्यक राहील.

९. सदर ड्रोन वापरण्यात येणारे क्षेत्र हे Green Zone मधील असावे.

१०. शेतकरी उत्पादक कंपनी, यांनी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राची तपासणी उपविभागीय कृषि अधिकारी व या कार्यालयाकडुन करण्यात येईल. अर्ज व सर्व कागदपत्रे अचुक असल्यास अनुदानाच्या / योजनेच्या मर्यादित राहुन खुल्या बाजारातुन यंत्र खरेदी करणे करीता उपविभागीय कृषि अधिकारी यांचे कडून पूर्वसंमती प्रदान करण्यात येईल.

११. शेतकरी उत्पादक कंपनी यांनी यंत्र खरेदी केल्यानंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्फत मुळ देयकास प्रस्ताव या कार्यालयास सादर करतील व तालुका कृषि अधिकारी मार्फत मोका तपासणी करण्यात येईल.

१२. थेट डी.बी.टी. कार्यप्रणालीने अनुदान शेतकरी उत्पादक कंपनीच्या बँक खात्यामध्ये RTGS/NEFT व्दारे जमा करण्यात येईल.

Phirlkar

**(प्रिती म.हिरळकर)**
**प्रकल्प संचालक (आत्मा)**
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा
चंद्रपूर

## प्रती यंत्र खर्चाचे अंदाजपत्रक

| अ.क्र. | यंत्र / औजारांचे नांव | संख्या | एकूण अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | No of Complete Drone<br>One complete unit of 10 L Capacity Agricultural Spraying Drone covers :<br>• 1 Nos. Agricultural Spraying Drone<br>• 1 Nos. Remote Controller<br>• 1 Nos. High-Power Charger (1000W or more)<br>• 1 Pack of Batteries (refers to 2 Nos. of 6S 25200mah Lithium Ion Batteries)<br>• 3 Pairs of Propellers as Complimentary | १ | ५५०००० |
| २ | No. of extra Charging Hubs | १ | २५००० |
| ३ | No. of Extra Propellers in Pairs | ४ | २०००० |
| ४ | No of Extra Nozzles | ४ | २०००० |
| | **एकूण** | | **६,१५,०००/-** |

PHirzalkar

**(प्रिती म.हिरळकर)**
**प्रकल्प संचालक (आत्मा)**
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा
चंद्रपूर